# प्रेस नोट

**दिनांक : २३/१०/२०२४**

२१ वर्षापासुन फरारी असलेल्या आरोपीतास फेरअटक केले बाबत.

पायधुनी पोलिस ठाणे गुन्हा नोंद क्रं.८६/२००२, कलम ३८०,४५७,३४ भादवि कोर्ट केस क्र. १००९/पी/२००३ मधील फरारी आरोपी मस्तान इबाहिम शेख याची नियमित सुनावणी मा. अति. मुख्य महानगर दंडाधिकारी, २ रे न्यायालय, मांझगाव (शिवडी), मुंबई यांच्या न्यायालयात चालू आहे. नोंद गुन्हयातील आरोपी नामे मस्तान इबाहिम शेख हा सदर गुन्हयाच्या सुनावणीकामी मा. न्यायालयात वारंवार गैरहजर रहात असल्याने त्यास फरारी घोषित केले होते.

सदर फरारी आरोपीताचा पोउनि अनिल वायाळ व पथक यांनी तांत्रीक कौशल्याचे आधारे शोध घेतला असता आरोपी मस्तान इबाहिम शेख याचे मुळ गांव चेन्नई असुन तो वारंवार आपले वास्तव्याचे ठीकाण बदलत असल्याचे दिसुन आले. सदर आरोपी दिनांक २३/१०/२०२४ रोजी मध्यरात्री धारावी, मुंबई या परिसरात येत असल्याची माहिती प्राप्त झाली असता त्याआधारे सापळा रचुन फरार आरोपी नामे मस्तान इबाहिम शेख यास ताब्यात घेवून त्यास पायधुनी पोलीस ठाणेस आणुन त्यास नमुद गुन्हयात फेरअटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त मा. अभिनव देशमुख सो., मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, मा. डॉ. मोहितकुमार गर्ग सो., मा. सहाय्यक पोलीस आयुक्त पायधुनी विभाग श्रीमती ज्योत्सना रासम, पायधुनी पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बाळकृष्ण देशमुख सो., पोलीस निरीक्षक श्री. संतोष रासम (गुन्हे) यांच्या मार्गदशनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस उप निरीक्षक अनिल वायाळ,पोहवा. इरफान खान, पो.हवा शिरवाडकर, पो.हवा.दिपक निकम, पो हवा.शंकर राठोड, पो.हवा.मुल्ला, पोशि.नितेश घोडे ,पो.,शि.मोकल यांनी केली आहे.